दिल से



प्रा. प्रियानंद आगळे
अध्यक्ष : इको-निड्स फाऊंडेशन

# पर्यावरणाची पहिली लढाई जिंकली

माझे बालपण औरंगाबाद येथील परसोडा या खेडेगावात गेले. बकऱ्यांच्यामागे फिरणे, नदीत पोहणे हे त्या वेळचे आवडते छंद. पण हे छंद पुढच्या आयुष्यासाठी उपयोगी पडणार नाहीत, याची जाणीव माझ्या आईला होती. शैक्षणिक उन्नतीसाठी आम्ही औरंगाबाद शहरात एका छोट्याशा घरात राहयला आलो. पुढे इथेच स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतले. परंतु शिक्षण सुरू असताना गावाकडील आणि तिथल्या पर्यावरणाविषयी असलेले प्रेम कधीच आटले नाही. त्यामुळे प्रत्येक सुट्टीत मी गावाला जात होतो. संत ज्ञानेश्वर विद्यालयात आठवीच्या वर्गात घेतलेला प्रवेश कधीच विसरता येणार नाही. हाच तो खरा दिवस होता की, माझ्या पर्यावरणाविषयीच्या संवेदना अधिक जागृत झाल्या. ही शाळा खामनदीच्या काठावर होती. नदी ओलांडून दररोज शाळेत जावे लागत होते. या नदीच्या पात्रात शहरातील सांडपाणी सोडलेले बघत होतो. याशिवाय महापालिकेकडून याच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचराही टाकला जात होता. खामनदीची अवस्था बघायचो त्या वेळी माझ्या गावच्या बोरनदीची व तिथल्या पर्यावरणाची आठवण यायची.

आमचे वडील हे शिस्तप्रिय व मित्रत्वाने वागणारे होते. वाईट मुलांच्या संगतीत मुलगा बिघडू नये म्हणून ते अभ्यासात किंवा एखाद्या विषयावर चर्चा करण्यासाठी व्यस्त ठेवायचे. नववीला गेलो तेव्हा अभ्यास वाढला. छोट्याशा घरात मोठ्या कुटुंबामुळे अभ्यास करण्यासाठी पुरेशी जागा नव्हती म्हणून घराजवळ असलेल्या बिबिका मकबरा (ताज महलची प्रतिकृती) येथील निसर्गरम्य परिसरातील झाडाखाली अभ्यासाला बसायचो. परंतु अभ्यास करताना हळूच कानावर विविध पक्ष्यांचे आवाज पडायचे आणि पुन्हा मला गावची ओढ खुणवायची. एक दिवशी बिबिका मकबऱ्याच्या पांढऱ्याशुभ्र वास्तूवर माझी नजर पडली. ही वास्तू काळी पडत असल्याचे आढळले. ती काळी का पडली याचे निरीक्षण कारायचे ठरवले. वास्तूच्या अवतीभोवतीचा परिसर पिंजून काढला. तिथे बऱ्याच विटभट्ट्या असून त्याच्या प्रदूषणामुळेच ही वास्तू काळवंडत आहे. अशातच मी दहीवी पास झालो. पुढे शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद येथील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेतला, परंतु अभ्यासासाठी बिबिका मकबरा परिसराशिवाय पर्याय नव्हता. माझे वडील नेहमीच नवनवीन गोष्टी आणि शासकीय धोरणाबाबत माहिती द्यायचे आणि नंतर चर्चा करायचे. शासनाने लोकशाहीदिनाची सुरुवात नुकतीच केली होती. या बैठकीला वडील गेले होते. घरी आल्यावर त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांसमोर आपण प्रशासनामार्फत प्रलंबित कामे मांडू त्यांचा पाठपुरावा करू शकतो. त्या वेळी माझ्या डोळ्यासमोर बिबिका मकबरा आला. वडिलांना विचारले की, लोकशाहीदिनात बिबिका मकबरा हा विषय मांडू शकतो का? त्यांनी लगेच होकार दिला, मात्र हा विषय मी मांडणार आहे, हे सांगण्याचे धाडस झाले नाही.

मी लोकशाहीदिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी व्ही. राधा मॅडम यांच्यासमोर मकबऱ्याच्या प्रदूषणाचा प्रश्न उपस्थित केला. नेहमीच वैयक्तिक प्रश्न इथे विचारण्यासाठी लोक येतात. तेव्हा कोणी तरी सामाजिक प्रश्न उचलला, हे ऐकून त्यांना आनंद झाला. त्यांनी लगेच माझ्या अर्जावर शेरा मारून संबंधित अधिकाऱ्याकडे दिला. मला पहिल्याच वेळी शासकीय कार्यालयात मिळालेले ते प्रोत्साहन होते, मात्र काही दिवस उलटूनही विटभट्ट्यांची परिस्थिती 'जैसे थी' होती. हा विषय घेऊन पुन्हा राधा मॅडमना भेटलो. त्या वेळी संबंधित अधिकाऱ्याना त्यांनी धारेवर धरले. त्यानंतर त्या वीटभट्ट्या स्थलांतरीत झाल्या. हा सामाजिक कामातला पहिला विजय व प्रदूषणाबाबत लढण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न होता.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, त्याचप्रमाणे ती चळवळीची भूमी म्हणून ओळखली जाते. या